Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 575 – 580
DOI: 10.5281/zenodo.10258859

Original Research Article

# महात्मा गांधींचे विचार आणि साहित्य

प्रा. डॉ. संभाजी दादाराव पाटील
कै. बाबुरावजी पाटील महाविद्यालय, हिंगोली ४३१५१३ महाराष्ट्र, भारत
*Corresponding author E-mail*: sambhuraje123@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

मोहनदास करमचंद गांधी हे इतिहासातील एक वैश्विक व्यक्तिमत्त्व, पंचा नेसणाऱ्या कृश शरीराच्या या माणसाने ना कधी उच्च राजकीय पदे भूषविली, ना अमाप संपत्ती जमवली. तरीही ते विश्ववंदनीय ठरले. आयुष्याच्या सुरुवातीलाच त्यांनी सत्याच्या आधारे जगण्याचा संकल्प केला व अखेरपर्यंत तो पाळला. यामुळे त्यांच्या ठिकाणी प्रचंड असे नैतिक सामर्थ्य निर्माण झाले. उच्च नैतिक मूल्यांच्या आधारे लढा देऊन बलाढ्य अशा इंग्रज साम्राज्याच्या तावडीतून हिंदुस्थानची सुटका केली. देश, धर्म, जातीच्या पलीकडे जाऊन संबंध मानवजातीच्या मुक्तीसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. सत्य, अहिंसा, मानवता, बंधुता या चिरंतन अशा नीतिमूल्यांची जगाला देणगी दिली. महात्मा गांधी हे एक जगाला पडलेले स्वप्न होते. देदीप्यमान ताराच तो साक्षात सत्य! आपल्या व्रतस्थ जीवनादर्शातून त्यांनी नवा इतिहास घडविला. निष्कलंक चारित्र्य, साहस, धैर्य आणि दृढनिश्चय अशा अनेक गुणाचा मिलाफ त्यांच्या ठिकाणी होता. सागराप्रमाणे विशाल असणाऱ्या या व्यक्तिमत्त्वात अनेक जाती, धर्म, संप्रदायांना सामावून घेण्याची क्षमता होती. म्हणूनच आजही संबंध मानवजातीच्या हृदयसिंहासनावर ते विराजमान झालेले दिसतात. रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल व्हावा आणि त्या तेजाने सर्व बातावरण मंगलमय व्हावे, अशी स्थिती सबंध जगाने 'गांधीयुगात अनुभवली. त्याची प्रभा साहित्यजगतात प्रकर्षाने उमटली.

महात्मा गांधीजींचा जीवनपरिचय (जन्म २ ऑक्टोबर १८६९ मृत्यू ३० जानेवारी १९४८) मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरात राज्यातील पोरबंदर येथे वैष्णव वाणी कुटुंबात झाला. त्यांचे वडील पोरबंदरचे दिवाण होते. आई पुतळाबाई, वडील करमचंद हे शीलवंत व धर्मनिष्ठ दाम्पत्य होते. घरी धर्मग्रंथांचे पठण, उपवास, व्रत इत्यादी धार्मिक विधी नित्यानियमाने होत. ध्रुव, प्रल्हाद, हरिश्चंद्र यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोग आणि इतर धार्मिक

यांचा गांधीजींच्या बालमनावर खोल परिणाम झाला. अशा प्रकारे अहिंसा, सत्याग्रह, सदाचाराची मनोभूमिका लहानपणीच तयार झाली.

मोहनदास व कस्तुरबा यांचा विवाह विद्यार्थिदशेतच वयाच्या १३व्या वर्षी झाला. १८८७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते १८८८ ला बॅरिस्टर बनण्याच्या हेतूने इंग्लंडला गेले. बॅरिस्टरच्या शिक्षणाबरोबरच त्यांनी जगातल्या प्रमुख धर्मग्रंथांचा अभ्यास केला. १० जून १८९१ रोजी ते बॅरिस्टर झाले. १८९३ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेत वकिली करण्यासाठी रवाना झाले. तेथील वर्णभेद, गुलामी प्रथा, जुलमी कर इत्यादींनी हैराण होऊन सत्याग्रहाच्या माध्यमातून न्याय्य हक्कांसाठी त्यांनी लढा दिला. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी 'इंडियन कॉंग्रेस' नावाची संस्था स्थापन केली. बोअर युद्धात गोऱ्या सैनिकांची शुश्रूषा केली. १९०७ मध्ये काळया कायद्याविरुद्ध सत्याग्रह केला. १९१२ साली गांधीजींची व त्यांचे राजकीय गुरू गोपाल कृष्ण गोखले यांची भेट झाली. त्यांनी दरबान शहराजवळ फिनिक्स आश्रमाची स्थापना केली. हरिद्वार येथे कांगडी गुरुकुलाचे आचार्य श्रद्धानंद यांनी त्यांचा प्रथम 'महात्मा' म्हणून उल्लेख केला. त्यांनी २५ मे १९१५ मध्ये अहमदाबादजवळ साबरमती येथे 'सत्याग्रहाश्रमा'ची स्थापना केली. १९१७ मध्ये चंपारण्य येथे नीळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी सत्याग्रह केला. १९२० मध्ये असहकार चळवळ, १९३० मध्ये सविनय कायदेभंग, १९३१ मध्ये गोलमेज परिषद, १९३२ मध्ये गांधी-आंबेडकर करार, १९४२ साली चले जाव चळवळ सुरू करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यात ते यशस्वी झाले. त्याना नेताजींनी 'राष्ट्रपिता' हा सर्वोच्च बहुमान दिला. ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**महात्मा गांधींचे विचार आणि साहित्य**

समाज आणि साहित्य यांचा परस्परसंबंध असतो. प्रत्येक कालखंडाचा एक युगधर्म असतो. गांधी विचारांचा एक कालखंड होता. त्याचाही परिणाम आधुनिक साहित्यावर झालेला दिसतो. निरनिराळया वाङ्मय प्रकारावर गांधी विचारांचा झालेला परिणाम पाहणे, हा या लेखनाचा हेतू आहे. इ.स. १९२० मध्ये जहाल मतबादी लोकमान्य टिळकाचे निधन झाले. गांधीयुगाची पहाट झाली.महात्मा गांधींची विचारसरणी गांधीवाद म्हणून समाजात अवतरली.

**गांधीवाद**

महात्मा गांधीची गांधीवाद म्हणून एक स्वतंत्र विचारपद्धती आहे. ही विचारपद्धती अध्यात्मवादावर आधारलेली आहे. ती एक जीवनपद्धती आहे असे म्हटले गेले तरी गांधींनी विपुल लिखाणामध्ये सांगितलेली एक स्वतंत्र विचारसरणी आहे, हे त्यांचे लेखन अभ्यासता सहज लक्षात येते. तिचा प्रभावही आधुनिक जगाच्या सामाजिक व राजकीय विचारसरणीवर पडलेला आहे. अहिंसा, सत्य, अस्त्येय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे पाच नैतिक नियम गांधींच्या विचारसरणीचा पाया आहेत. या नियमांना उपनिषद व गीतेचा आधार आहे.

गांधीवाद हा धार्मिक मानवतावाद आहे. भारतीय समाजमनावर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे ती एक मोठी घटना मानली पाहिजे. भारतीय स्वातंत्र्याला नवचैतन्य देण्याचे श्रेय महात्मा गांधीनाच द्यावे

लागते. महात्मा गांधींच्या विचाराने भारावल्यामुळे अनेक तरुण गांधीजींच्या लढ्यात उतरले. त्याचे परिणाम राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्राप्रमाणे साहित्यावरही झालेले दिसतात.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो म्हणून आपण आधुनिक साहित्यावर त्याचा प्रभाव पाहू १९२० ते १९५० हा कालखंड 'गांधीयुग' म्हणून संबोधला जातो. १९३० ला गांधीजींनी खेड्याकडे चला अशी हाक दिली. साहित्याच्या निरनिराळ्या वाङ्मयप्रकारात त्याचे कमी-अधिक चित्रण झालेले दिसते ते पाहू

**नाटक**

१९२० पूर्वीचे जे मराठी ललित साहित्य आहे, त्यात गांधीवादाला पूरक अशा काही छटा आढळतात. उदा. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकातील नायिकेने वसुंधरेने आत्मत्यागाने खलनायकाच्या 'हृदयस्थ ईश्वराला' जागृत करणे. त्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे किंवा 'भावबंधन'मधील घनश्यामसारखा खलनायक धुंडिराजाच्या निरपेक्ष दयेमुळे वितळणे, अथवा 'राजसन्यास'मधील संभाजीने 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी' असे घोषित करणे, एक प्रकारे गांधीवादी भूमिकेला जवळचे वाटते. नाट्याचार्य खाडिलकरांच्या 'हरिश्चंद्राने' (सत्त्वपरीक्षा) आत्मबलावर वैयावृत्ती बोकाळलेल्या स्वकालाला खेचून सन्मार्गाला आणण्याची प्रतिज्ञा करणे किंवा

'कीचकवध' नाटकातील 'कंकाने' (धर्म) कीचकाच्या दुष्ट वृत्तीचे निर्मूलन होते का ? हे पाहण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्नशील राहणे. यात गांधीवादाला असणाऱ्या पूरक छटा दिसतात.

गांधीवादी मूल्यांचा मराठी नाट्यसृष्टीतील वितरणाच्या अनुरोधाने विचार करता असे दिसते, की गांधीपूर्वकाळात निदान गांधीवादसदृश विचारांचे जेवढे नाट्यात्मक दर्शन घडते, तेवढेही प्रत्यक्ष गांधीयुगात घडत नाही.

गाधीबादाच्या प्रभावातून मामा वरेरकरासारख्या समाजप्रवण नाटककराचे 'सत्तेचे गुलाम' (१९२२) हे नाटक जन्माला आले. व्यावसायिकदृष्ट्या ते यशस्वी झाले; पण त्यातील गांधीवादाचे दर्शन वरवरचे होते. त्याची 'वदे भारतम्' व 'हा मी उभा आहे' ही नाटके वरीलप्रमाणेच आहेत. थोडक्यात, नाट्य वाङ्मयप्रकारावर गांधीयुगाचा पगडा दिसत नाही, असेच म्हणावे लागते.

**कादंबरी**

गांधीवादाचा फार मोठा प्रभाव वा. म. जोशींवर होता. साक्षेपी समाजचिंतनाबद्दल, विचार गाभीर्याबद्दल प्रसिद्ध असलेले वामन मल्हार तर 'तत्त्वचितक कादंबरीकार' म्हणून ओळखले जातात. 'इंदू काळे आणि सरला भोळे' या त्यांच्या सुप्रसिद्ध कादबरीचा नायक विनायकराव भोळे गांधीवादी वृत्तीचा, गांधीच्या पद्धतीचा आश्रम काढून खेड्यात राहणारा. असे असूनही ती गांधीवादी विचारांशी कुठे तादात्म झाल्याचे आढळत नाही. नायकाला भावनादृष्ट्या गांधीवाद जवळचा वाटत असला तरी गांधीवादाशी तो समरस होऊ शकलेला नाही.

फडके-खांडेकर माडखोलकर पु. य. देशपांडे हे साहित्यिक गांधीयुगातच उदयाला आले त्यामुळे या ना त्या प्रकारे ते गांधीवादाशी संबंधित राहिले. प्रसंगानुरूप त्यांच्या कादंबरीतून गांधीयुगीन राजकीय तत्त्वप्रणालीचे साद-पडसाद पुन्हा पुन्हा उमटताना आढळतात.

ना. सी. फडके (१९२०-१९५०) या काळातील सर्वाधिक लोकप्रिय कादंबरीकार, आपल्या कादंबरीलेखनाबाबत लिहिताना, बोलताना, आपल्या कादंबऱ्या जीवनातील सर्व अंगांना त्यात राजकारणही आलेच, स्पर्श करणाऱ्या आहेत, असे अभिमानाने सांगतात' त्यांनी काही कादंबन्यामधून गांधीजींनी उभारलेल्या चळवळीचा उल्लेख केला आहे. 'प्रवासी', 'निरंजन', 'समरभूमी', 'उन्माद' या कादबऱ्याचा उल्लेख करता येईल. यातून ना. सी. फडके गाधीविचारांवर टीकाच करतात, असे समीक्षकाचे म्हणणे आहे.

फडके याच्यापेक्षा ज्ञानपीठ पुरस्कारविजेते वि. स. खांडेकर गांधीवादाशी भावनेने समरस झालेले दिसतात. त्यांचा सामान्याचा कळवळाही तसा प्रामाणिक आहे. जीवनातील उदात्तता, पंडित्याच्या पोकळ बडबडीपेक्षा समाजातील लहान लहान व्यक्तींच्या त्यागावर आधारली आहे, याचेही त्यांना भान आहे. जगातील सामान्य माणूस कसा सुखी होईल याची काळजी फक्त समाजवाद आणि गांधीवादीच वाहतात, असे त्यांनी क्रौंचवध' या कादंबरीच्या प्रस्तावनेत नमूदही केले आहे. (पृ. २४, २५) त्यांच्या 'कांचनमृग' ते 'ययाती' पर्यंतच्या कादंबऱ्यातून गांधीवादाचा प्रभाव जाणवतो. उल्का' ही त्यांची (प्रामाणिक गांधीवादी कादबरी आहे.

प्रेमा कटक यांची काम आणि कामिनी' किंवा बिलवलकरांची 'सुनीता' यांसारख्या कादंबऱ्या गांधीवादाला सच्चेपणे समोच्या जाण्याचा प्रयत्न करतात; पण त्यांचा पल्ला फार मर्यादित आहे. साने गुरुजींनी 'श्यामची आई', 'घडपडणारी मुले' अशा अनेक कादंबऱ्या लिहून आपली गांधीविचारावरील निष्ठा प्रकट केली, स्वातंत्र्याची चळवळ, स्वार्थत्याग, बंधुभाव, समत्व, करूणा इत्यादींचे चित्रण साने गुरुजींनी आपल्या हळुवार शैलीने केले आहे. त्यांच्या कादंबन्यानी ध्येयवादाची जोपासना केली. त्यांचे भाबडे मन, त्यांचा आशावाद, त्यांची कमालीची हळुवार वृत्तीदर्शन त्यांच्या लेखनातून घडते. साने गुरुजींसारखा एखादा दुसरा साहित्यिक गांधीवादी दिशेने मनःपूर्वक वाटचाल करू पाहत होता; परंतु गांधीवादाचा एकदर आवाका समर्थपणे पेलून धरण्यास लागणारे प्रतिभावळ माने गुरुजीजवळ नसल्यामुळे मध्यवर्ती साहित्यधारेवर साने गुरुजींचा प्रभाव पडू शकला नाही.

१९४० नंतर कादंबरी विश्वात प्रादेशिक, ग्रामीण स्वरूपाचे लेखन रुजू झाले. श्री. म. माटे बानी ‘उपेक्षिताचे अंतरंग'मधून अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत काम केलेले दिसते; पण माटेही मनाने गांधीवादापासून दूर राहिले.वि. वा. शिरवाडकरांनी 'वैष्णव' कादबरी लिहिली. यात गांधीचळवळीचे साद-पडसाद उमटलेले आढळतात; पण तेही स्थूल स्वरूपाचेच आहे.

गांधीवादाचा विपर्यास ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'मुखवटा' या कादंबरीतून दिसतो.खरा गांधीवादाचा पुरस्कार आचार्य विनोबा भावे, आचार्य काका कालेलकर, आचार्य धर्माधिकारी, आचार्य जावडेकर व साने गुरुजी यानी आपल्या

साहित्यातून केला असे म्हणता येते. कविता : मराठी कवींनी मोठ्या प्रमाणात जानपद गीतांची रचना करून गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या आवाजाला साद दिली. गद्यसाहित्यांच्या तुलनेने या काळातील मराठी भावकवितेने गांधीवादाला नसेल; पण गांधी या विभूतीला अत:करणपूर्वक मानवंदना दिलेली दिसते,कवी भा.रा.तार्थेपासून बा. सी. मर्ढेकर यांच्यापर्यंत अनेक नव्या-जुन्या कवींचा अंतर्भाव होतो.

कवी भा. रा. तांबेनी गांधीविचाराने प्रभावित होऊन काही कविता लिहिल्या. 'रुद्रास आवाहन हो त्यांची जालियनवाला बाग हत्याकाडाची धिक्कार करणारी कविता, तर गाडी बदलली' या कवितेत अहिंसा तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला आहे. 'कोण रोधील' या कवितेतून तांबे यांनी गांधीजींना आणि त्यांच्या अनुयायांना राष्ट्रनिर्माति म्हटले आहे.

१९२० मधील गाधीप्रणीत पहिली असहकाराची चळवळ अयशस्वी झाल्याबद्दलचे दुःख त्यांच्या 'वाटले नाथ हो' या कवितेतून उत्कटतेने प्रकट झाले आहे. 'उखळात दिले शिर... 'या भविष्याचिया दिव्य कारागिरा' अशा कवितांतून महात्मा गांधीच्या जीवनावर, कार्यावर कविता लिहिल्या आहेत. कविवर्य तावे हे मूलतः आध्यात्मिक वृतीचे व श्रेयोमंगलाचा शोध घेणारे गांधीयुगातील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ मराठी कवी होते, असे निर्विवादपणे गो. म. कुलकर्णीनी म्हटले आहे.

गांधीवादाचा उल्लेख असलेल्या कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या 'मज लोभस हा इहलोक हवा' या कवितेतील ओळी जाणीवपूर्वक लिहिलेल्या दिसतात. 'मार्क्सचा मज अर्थ हवा अन् फ्रॉइडचा मज काम हवा या असुरांपरि राबविण्या धरि गांधींचा मज राम हवा' बा. भ. बोरकरांचा 'महात्मायन' असे प्रदीर्घ महाकाव्य लिहिण्याचा संकल्प अर्धवट पूर्ण झाला.

माधव ज्युलियन यांनी महात्मा गांधी आणि टागोर, महात्मा काय करील, एकटा या मोजक्या पण सुंदर कविता लिहिल्या. यशवंत, मनमोहन, बोरकर, कुसुमाग्रज, श्रीकृष्ण पोवळे, माडगूळकर, मर्ढेकर, विंदा करंदीकर अशा कितीतरी कवींच्या गांधीवरच्या कविता सहज डोळयांसमोर येतात. वसंत बापट, मंगेश पाडगावकर या कवींनी कवितांतून गांधीवादाचे अभिसरण दाखवले आहे.

**कथा**

या साहित्यप्रकारात बामन चोरघडे यांनी गांधीवादाच्या दिशेने कथालेखन केलेले दिसते. तर ग. दि. माडगूळकरांच्या कथा आणि कविता एकापरीने कलावंताच्या ठिकाणी झालेले गांधीवादाचे अभिसरण दर्शविणाऱ्या आहेत.

सारांशाने एवढेच म्हणावे लागते- १९२० ते १९५० या कालखंडातील आधुनिक साहित्यावर गांधीवादाचा खोलवर परिणाम झालेला नाही, तो बरवरचा आहे. साने गुरुजींच्याच साहित्यावर गांधीवादाचा खोलवर ठसा उमटलेला दिसतो.

**संदर्भ सूची**

१. म. गांधींचे संकलित वाङ्मयः संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १

२. प्रा. अ. म. जोशी, 'चरित्र-आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. महात्मा गांधी, 'मंगल प्रभात', परंधाम प्रकाशन, पवनार (वर्धा), अकरावी आवृत्ती २००४, पृ. ५५.

४. गो. म. कुलकर्णी, 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य' बीजलेख, समाविष्ट 'गांधीवाद आणि, आधुनिक मराठी साहित्य', संपादक, डॉ. दत्तात्रय पुडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९५ (प्र. आ.), पृ. ४०.

५. रमेश तेंडुलकर, 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य' चर्चालेख, उनि, पृ. ९७-९८. सहायक ग्रंथ १. मराठी विश्वकोश खंड ४ था, प्रमुख संपादक, तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६ (प्र.प्र.)

६. 'गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य' संपादक, डॉ. दत्तात्रय पुडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९५ (प्र.आ.)

७. संवेदना प्रा. डॉ. दिलीप बिरुटे, २१ डिसेंबर २००८.